महाराष्ट्र शासन

क्र. किसनि-२०१९/ प्र.क्र.२०/११-अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०८ ऑक्टोबर, २०२०

प्रति,
आयुक्त (कृषि)
कृषि आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय :-** पंतप्रधान किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत चुकीच्या खात्यात/अपात्र व्यक्तीच्या खात्यात जमा झालेला लाभ परत करण्याकरीता Standard Operating Procedure (SOP) निर्गमित करणेबाबत

**संदर्भ :-** १) शासन परिपत्रक क्र. किसयो-२०१९/ प्र. क्र.२०/११-अे दि. ४ फेब्रुवारी,२०१९.
२) शासन निर्णय क्र. किसयो-२०१९/ प्र. क्र.२०/भाग-४/११-अे दि.१५ फेब्रुवारी, २०१९
३) कृषि आयुक्त यांचे पत्र क्र. जा.क्र.कृ.गणना/पीएम किसान/२३५८४/२०२० दि. २५ सप्टेंबर, २०२०

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळविण्याकरिता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजना सुरु केली आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM- KISAN) राबविण्यासंदर्भात मा. मुख्य सचिव स्तरावर संदर्भ क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच यासंदर्भात वेळोवेळी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निदेशानुसार सदरील योजना राज्यात राबविण्यास संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन परिपत्रक / शासन निर्णयात आयुक्त (कृषि ) हे या योजनेचे राज्यस्तरावरील अंमलबजावणी प्रमुख म्हणून काम पाहतील अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

सबब संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत चुकीच्या खात्यात/अपात्र व्यक्तीच्या खात्यात जमा झालेला लाभ परत करण्याकरीता शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या Standard Operating Procedure (SOP) ला शासनाची मान्यता देण्यात येत असून सदर SOP आपल्या स्तरावरून सर्व संबंधिता क्षेत्रीय यंत्रणां निर्गमित करण्यात यावी व सदर SOP नुसार तत्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा, ही विनंती.

आपला,

०८
(सु.सं. धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी :-
उप आयुक्त (PM-KISAN), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

issued
9/10/2020

Shot on OnePlus